राज्यात सन २०१८ च्या खरीप हंगामामध्ये घोषित केलेल्या दुष्काळी भागातील ग्रामीण नळ पाणी पुरवठा योजनांची विद्युत देयकांची रक्कम टंचाई निधीतून देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः टंचाई २०१९/प्र.क्र.१३/पापु-१४**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: १७ जानेवारी, २०१९

वाचा -

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांकः एससीवाय २०१८/प्र.क्र.२४६/म-७, दिनांक ११.१२.२०१८ व दिनांक २१.१२.२०१८
२) शासन शुध्दीपत्रक, महसूल व वन विभाग क्रमांकः एससीवाय २०१८/प्र.क्र.२४६/म-७ , दिनांक ०४.०१.२०१९
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांकः एससीवाय १२/२०१८/प्र.क्र.६८/म-११, दिनांक १५.०१.२०१९

प्रस्तावना -

राज्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता, पिण्याच्या पाण्याच्या टंचाई वर मात करण्याच्या दृष्टीने विज देयक न भरल्यामुळे बंद असलेल्या ग्रामीण व नागरी नळपाणी पुरवठा योजनांच्या थकीत विद्युत देयकांच्या मुद्दलाच्या रकमेपैकी ५ टक्के इतकी रक्कम भरुन वीज पुरवठा सुरु करुन पिण्याच्या पाण्याच्या नळ पाणी पुरवठा सुरु करण्याबाबत तसेच दुष्काळ घोषित केलेल्या क्षेत्रातील नोव्हेंबर, २०१८ ते जून, २०१९ या ८ महिन्याच्या कालावधीतील ग्रामीण तसेच नागरी भागातील चालू विद्युत देयके टंचाई अंतर्गत प्राप्त होणा-या निधीमधून अदा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुषंगाने सदर उपाययोजनांवरील खर्च भागविण्याच्या दृष्टीने महसूल व वन विभागाने या विभागाकडे निधी वितरीत केला आहे. सदर प्राप्त झालेला निधी संबंधित जिल्ह्यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय -

शासनाने दुष्काळ घोषित केलेल्या क्षेत्रातील नळ पाणी पुरवठा योजनांच्या थकीत विद्युत देयके तसेच नोव्हेंबर, २०१८ ते जून, २०१९ या ८ महिन्याच्या कालावधीतील ग्रामीण तसेच नागरी भागातील

चालू विद्युत देयकांचा खर्च भागविण्यासाठी रुपये २४५०.०० लाख ( अक्षरी रुपये चोवीस कोटी पन्नास लाख फक्त ) इतका निधी सोबत जोडलेल्या प्रपत्र नुसार वितरीत करण्यासाठी संबंधीत विभागीय आयुक्तांकडे खालील अटींच्या अधीन राहून मुक्त करण्यात येत आहे.

१) शासनाने राज्यात दुष्काळ घोषित केलेल्या क्षेत्रातील ग्रामीण तथा नागरी भागातील ज्या पिण्याच्या पाण्याच्या योजना थकीत विद्युत देयकाची रक्कम भरली नसल्याने विद्युत पुरवठा खंडीत केल्यामुळे योजना बंद आहेत. तसेच सदर योजनेमधून योजना सुरु केल्यानंतर लोकांना पिण्याचा पाण्याचा पुरवठा होऊ शकेल अशाच योजनांसाठी सदर पाणी पुरवठा योजनांच्या थकीत विद्युत देयकांच्या मुद्दलापैकी ५ टक्के इतकी रक्कम विभागीय आयुक्तांनी संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना तात्काळ उपलब्ध करुन द्यावी.

२) तसेच दुष्काळ घोषित केलेल्या क्षेत्रातील सर्व ग्रामीण तसेच नागरी भागातील पाणी पुरवठा योजनांची नोव्हेंबर, २०१८ ते जून, २०१९ या ८ महिन्याच्या कालावधीतील चालू विद्युत देयके अदा करण्याबाबत निधी खर्च करण्यात यावा.

३) सदर निधी प्राथम्याने ज्या योजनांची विद्युत देयके अदा करुन पाणी पुरवठा सुरु होईल अशाच योजनांच्या थकीत देयकाच्या ५ टक्के रक्कम अदा करण्यासाठी वापरण्यात आल्यानंतरच उर्वरीत निधी टंचाई कालावधीतील चालू देयके अदा करण्यासाठी वापरण्यात यावा.

४) थकीत विद्युत देयकाची रक्कम अदा केल्यानंतर त्याबाबतचा योजना निहाय अहवाल आठवड्याच्या प्रत्येक सोमवारी शासनास सादर करावा.

५) अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर उपलब्ध निधी अनावशक रितीने कोषागारात आहरीत करुन तो वाटपा अभावी बँकेत पडून रहाणार नाही, याची काटेकोर दक्षता घेण्याचे आदेश वेळोवेळी देण्यात आलेले आहेत, असे असतानाही कोषागारातून रक्कम आहरित करुन बॅकेत ठेवू नये अशा सक्त सूचना या शासन निर्णयान्वये पुन:श्च देण्यात येत आहेत. अशी बाब आढळून आल्यास त्याला तात्पुरता अपहार समजून, संबंधितांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल याची सर्वांनी नोंद घ्यावी. सदर निधी चालू आर्थिक वर्षातच खर्च होणे आवश्यक असून तो व्यपगत होणार नाही अथवा कोषागारातून आहरित करुन बँक खात्यात काढून ठेवला जाणार नाही, याची दक्षता घेण्याबाबत सर्व जिल्हा परिषदांना सूचना देण्यात येत आहेत.

६) विभागीय आयुक्तांकडे सोपविलेल्या निधीचा विनियोग करताना सदर निधी ज्या प्रयोजनासाठी वर्ग करण्यात आला आहे त्याचा त्याच प्रयोजनासाठी वापर होत आहे तसेच निधीचे वाटप करतांना संबंधित कामासाठी पूर्वी निधी वितरीत करण्यात आला नाही याची खातरजमा विभागीय आयुक्त यांनी करावी. तसेच ज्या प्रयोजनासाठी निधी वितरीत

करण्यात आला आहे, त्याबाबतची जिल्हानिहाय भौतिक प्रगतीची माहिती विभागीय आयुक्त यांनी शासनाकडे दर महिन्यास मासिक खर्चाच्या अहवालासोबत सादर करावी. निधीच्या वाटपाचे लेखे, अभिलेख विहीत कार्यपद्धतीनुसार अनुदान आहरीत व तिरीत करणा-या कार्यालयाच्या स्तरावर अद्ययावत ठेवण्यात यावे. त्याचप्रमाणे दरमहा होणा-या प्रत्यक्ष खर्चाची माहिती पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यंत एकत्रितरित्या शासनास सादर करावी. दर तीन महिन्यांनी झालेल्या खर्चाची, महालेखाकार कार्यालयात नोंदविण्यात आलेल्या खर्चाशी पडताळणी करुन त्याबाबतचे विहीत प्रमाणपत्र या विभागाकडे तात्काळ सादर करावे. तसेच कोणत्याही परिस्थितीत मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता नियंत्रक अधिका-याने घ्यावी. वितरीत करण्यात आलेल्या अनुदानातून जर काही रक्कम खर्ची पडणार नसेल तर ती रक्कम विहीत वेळेत शासनास प्रत्यार्पित करण्यात यावी.

७) याबाबतचा खर्च "मागणी क्र. सी-६, २२४५ -नैसर्गिक आपत्तीच्या निवारणार्थ सहाय्य, ०१-अवर्षण, १०२-पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, (९१)-राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९२) (०१) पिण्याच्या पाण्याचा आकस्मिक निकडीचा पुरवठा (२२४५ २१८५) ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर)" या उपलेखाशीर्षामध्ये भागवावा व त्याखाली अंतिमत: खर्ची टाकण्यात यावा.

८) आहरण व संवितरण अधिका-यांनी कोषागार / उप कोषागार अधिकारी यांजकडे पाठविण्यात येणा-या व बिलासोबत जोडल्या जाणा-या कॉम्प्युटर स्लीपमध्ये गौण / उपलेखाशीर्षाचा संगणक संकेतांकाचा न चुकता उल्लेख करावा. तसेच, कोषागारातून उपकोषागारातून आहरीत केलेल्या रक्कमेचा अहवाल शासनास सादर करावा.

**निधी वितरणाचा तपशील विभाग निहाय खालीलप्रमाणे आहे :-**

(रक्कम रुपये लाखात)

| अ.क्र. | विभाग | वितरीत करण्यात येत असलेले अनुदान |
|---|---|---|
| १ | कोकण | ५०.०० |
| २ | नाशिक | ४००.०० |
| ३ | पुणे | ४५०.०० |
| ४ | औरंगाबाद | ७५०.०० |
| ५ | अमरावती | ४००.०० |
| ६ | नागपूर | ४००.०० |
| | **एकूण** | **२४५०.००** |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०११४१७२७५२२७२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

R. B. Kumatgi

Digitally signed by R. B. Kumatgi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=96d578360190574be078f90f44cde8446df6e461003bf3672f18f9dbab1603da, cn=R. B. Kumatgi
Date: 2019.01.17 12:29:59 +05'30'

(राजेंद्र कुमटगी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. महालेखाकार, (लेखा व परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
२. महालेखाकार, (लेखा व परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर
३. अपर मुख्य सचिव (म.व पु.), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव ( ऊर्जा), उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
७. प्रधान सचिव (ग्रा.वि.), ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
८. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई,
९. विभागीय आयुक्त ( सर्व )
१०. जिल्हाधिकारी ( सर्व )
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ( सर्व )
१२. मुख्य अभियंता (सर्व ), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१३.मा. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहायक
१४.उप सचिव / पापु-१४, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहायक
१५.पापु-१४ संग्रहासाठी.

**प्रपत्र**

**विभागीय आयुक्तांनी खालीलप्रमाणे जिल्हा निहाय निधी वाटप करावा.**

| अ.क्र. | जिल्हा | निधी (रक्कम रु.लाखात) |
|---|---|---|
| १ | पालघर | ५०.०० |
| | **एकूण** | **५०.००** |
| २ | नाशिक | १००.०० |
| ३ | धुळे | ५०.०० |
| ४ | नंदुरबार | ५०.०० |
| ५ | जळगांव | १००.०० |
| ६ | अहमदनगर | १००.०० |
| | **एकूण** | **४००.००** |
| ७ | पुणे | १००.०० |
| ८ | सातारा | १००.०० |
| ९ | सांगली | १००.०० |
| १० | सोलापूर | १००.०० |
| ११ | कोल्हापूर | ५०.०० |
| | **एकूण** | **४५०.००** |
| १२ | औरंगाबाद | १००.०० |
| १३ | जालना | १००.०० |
| १४ | बीड | १००.०० |
| १५ | परभणी | १००.०० |
| १६ | हिंगोली | ५०.०० |
| १७ | नांदेड | १००.०० |
| १८ | उस्मानाबाद | १००.०० |
| १९ | लातूर | १००.०० |
| | **एकूण** | **७५०.००** |
| २० | अमरावती | १००.०० |
| २१ | अकोला | ५०.०० |
| २२ | वाशिम | ५०.०० |

| | | |
|---|---|---|
| २३ | बुलढाणा | १००.०० |
| २४ | यवतमाळ | १००.०० |
| | **एकूण** | **४००.००** |
| २५ | नागपूर | १००.०० |
| २६ | वर्धा | १००.०० |
| २७ | गोंदिया | ५०.०० |
| २८ | भंडारा | ५०.०० |
| २९ | चंद्रपूर | १००.०० |
| | **एकूण** | **४००.००** |
| | **एकूण बेरीज** | **२४५०.००** |

R. B. Kumatgi

Digitally signed by R. B. Kumatgi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=WSSD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=96d578360190574be078f90f44cde8446df6e461003bf3672f18f9dbab1603da, cn=R. B. Kumatgi
Date: 2019.01.17 12:30:33 +05'30'

(राजेंद्र कुमटगी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन